संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती

श्रीराम शिक्षण संस्था धामणगांव रेल्वे व्दारा संचालित

**श्रीराम कला महिला महाविद्यालय, धामणगांव रेल्वे**

# राष्ट्रीय सेवा योजना विभाग

## नियमित वार्षिक अहवाल
## सत्र- २०२४-२५


**प्राचार्य**
**डॉ. नंदकिशोर राऊत**
श्रीराम कला महिला महाविद्यालय धामंणगाव

**महिला कार्यक्रम अधिकारी**
**प्रा.डॉ. मोनाली इंगळे**
श्रीराम कला महिला महाविद्यालय धामंणगाव

# श्रीराम कला महिला महाविद्यालय धामणगाव रेल्वे

## राष्ट्रीय सेवा योजना विभाग

## नियमीत कार्यक्रम अहवाल - सत्र 2024 -25

## योग दिन (21/06/2024)

श्रीराम कला महिला महाविद्यालय धामणगाव येथे 21 जुन 2024 आंतराष्ट्रीय योगदिन हा राष्ट्रीय सेवा योजना व शारिरीक शिक्षण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या सुरवातीला शारिरीक शिक्षण संचालक डॉ.सुधीर पाथरे यांनी योगासनाचे शरीरावर होणारे फायदे यावर मार्गदर्शन केले. आणि योगासनाचे महत्व समजावुन सांगितले.

त्याचबरोबर महाविद्यालयातील शिक्षकेतर कर्मचारी व शिक्षक यांना योगासनाचे काही प्रात्यक्षिक करुन दाखविले. प्रत्येक योगासनाचे महत्व पटवुन दिले. आणि शरीराला त्या आसनाचा कसा फायदा होतो याबददल सविस्तर माहीती दिली.

कार्यक्रमाला आदर्श महाविद्यालय धामणगाव रेल्वे येथील डॉ.किशोरजी बारापात्रे हे प्रमुख अतिथी म्हणुन उपस्थित होते. तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक नितीन बिहाडे, डॉ.मोनाली इंगळे, डॉ.निता केने व शिक्षकेत्तर कर्मचारी राजकुमार भैय्या, नागोराव पंचबुध्दे, संतोष सिसोदे, शरद गवारले व प्रफुल कांबळे उपस्थित होते. अशाप्रकारे महाविद्यालयामध्ये योगदिन साजरा करण्यात आला.









# श्रीराम कला महिला महाविद्यालय धामणगाव रेल्वे

## राष्ट्रीय सेवा योजना विभाग

## नियमीत कार्यक्रम अहवाल - सत्र 2024 -25

### वृक्षोत्सव पंधरवाडा उत्साहात साजरा

श्रीराम कला महिला महाविद्यालय धामणगाव रेल्वे येथे 'जागतीक पर्यावरण दिनाचे' औचीत्य साधुन 10/06/2024 ते 24/06/2024 हा वृक्षसंवर्धन पंधरवाडा साजरा करण्यात आला महाविद्यालयाच्या परिसरामध्ये वृक्षांची लागवड करण्यात आली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.राऊत सर यांच्या हस्ते आवळ्याचे झाड लावण्यात आले. तसेच महाविद्यालयातील डॉ.पाथरे सर, डॉ.केने मॅडम, डॉ.इंगळे मॅडम यांच्या हस्ते वृक्ष लावण्यात आले.

महाविद्यालयातील प्रा.नितीन बिहाडे सर यांच्या जन्म दिनाचे औचित्य साधुन त्यांचे हस्ते वृक्षारोपन करण्यात आले. अशाप्रकारे महाविद्यालयीन परिसरामध्ये आवळा, वड, पिंपळ, कडुलिंब, जांभुळ इत्यादी वृक्षांची रोपटी लावुन हा महोत्सव साजरा करण्यात आला.

वृक्षरोपनासाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी अजुभाऊ कुळकर्णी राजेश भैय्या, संतोष सिसोदे, शरदभाऊ गवारले, नागोरावजी पंचबुध्दे, प्रफुल कांबळे हे सर्व उपस्थित होते.

कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजना महिला कार्यक्रम अधिकारी डॉ.मोनाली इंगळे यांनी केले होते. आणि कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.





**श्रीराम कला महिला महाविद्यालय धामणगाव रेल्वे**

**राष्ट्रीय सेवा योजना विभाग**

**नियमीत कार्यक्रम अहवाल - सत्र 2024 -25**

**क्रांतीदीन साजरा (9 ऑगष्ट 2024)**

श्रीराम कला महिला महाविद्यालय धामणगाव रेल्वे येथे 9 ऑगष्ट 2024 क्रांतीदीन उत्साहात साजरा करण्यात आला. महाविद्यालयातील ग्रंथपाल डॉ.निता केने यांनी शहीद भगतसिंग यांच्या फोटोला हारार्पण करुन आदरांजली वाहीली. त्यानंतर महाविद्यालयातील प्राध्यापक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी फोटोचे पुजन करुन शहीद भगतसिंग यांना आदरांजली वाहीली. कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.





**‘एक पेड मॉ के नाम’** उपक्रमाअंतर्गत

## श्रीराम कला महिला महाविद्यालयात वृक्षारोपण

आजच्या युगात वृक्षसंवर्धन काळाची गरज आहे. पर्यावरणाचा ढासळता समतोल लक्षात घेता संतुलन राखणे आपली जबाबदारी आहे. हाच उददेश डोळयासमोर ठेवुन, तसेच स्वातंत्राच्या अमृत महोत्सवा निमीत्य भारत सरकारने एक पेड मॉ के नाम उपक्रमा अंतर्गत मोठया प्रमाणत वृक्षारोपन अभियान हाती घेतले आहे. या अंतर्गत राष्ट्रीय सेवा योजना यांच्या माध्यमातुन महाविद्यालयात वृक्षारोपन करण्यात आले. या अभियानात प्रत्येक नागरीकाने एक झाड आपल्या आईच्या नावाने लावावे व त्यांचे संगोपन करावे ही भावना आहे. म्हणुनच आपण सर्वांनी झाडांचे महत्व समजुन घेतले पाहीजे. असे प्रतिपादन प्राचार्यांनी केले. विद्यार्थीनींना झाडे देण्यात आली व महाविद्यालयाच्या परीसरात झाडे लावण्यात आले.

कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजनेच्या महिला कार्यक्रम अधिकारी डॉ.मोनाली इंगळे यांनी केले होते. कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्रा.नितीन बिहाडे, प्रा.अभिजीत दौड, डॉ.राजेश आडे, डॉ.निता केने, डॉ.सुधीर पाथरे व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. तसेच बहुसंख्य विद्यार्थीनींनी सहभागी झाल्या होत्या.





**हर घर तिरंगा अभियानाला सुरवात** (13/08/2024)

श्रीराम कला महिला महाविद्यालयामध्ये स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवा अंतर्गत दि.13/08/2024 रोजी विद्यार्थीनींना व्यसनमुक्तीची शपथ देण्यात आली. समाजातील घटकांना व्यसनापासुन दुर करणे हे आपले कर्तव्य आहे याची जाणीव विद्यार्थीनींना मार्गदर्शन करतांना डॉ.राजेश आडे यांनी करुन दिली.

त्याचबरोबर घरोघरी तिरंगा अभियाना अंतर्गत विद्यार्थीनींना तिरंगा वाटप करण्यात आले. महाविद्यालयातील प्रा.डॉ.सुधीर पाथरे, डॉ.राजेश आडे आणि डॉ.मोनाली इंगळे यांनी तिरंग्याचे वाटप केले. आणि डॉ.पाथरे सरांनी तिरंग्याचे महत्व विद्यार्थीनींना पटवुन दिले.

कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजना महिला कार्यक्रम अधिकारी डॉ.मोनाली इंगळे यांनी केले. कार्यक्रमाला महाविद्यालयीन शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते तसेच बहुसंख्य विद्यार्थीनी उपस्थित होत्या.

**श्रीराम कला महिला महाविद्यालय स्वच्छता अभियान व रॅलीचे आयोजन**

श्रीराम कला महिला महाविद्यालय मध्ये स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करण्यात आला स्वातंत्र्याच्या पूर्व संस्थेला महाविद्यालयामध्ये हर घर तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले रॅलीमध्ये विद्यार्थ्यांनी स्वतंत्राचा जयघोष करून भारत मातेला नमन केले आणि जनजागृती केली त्याचबरोबर महाविद्यालयातील आजूबाजूचा परिसरस्वच्छ केला. आणि उदयाच्या स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला स्वच्छतेने महत्त्व पटवून देऊन दिले आणि विद्यार्थिनींना आपल्या घराच्या आजूबाजूच्या परिसरात देखील स्वच्छ करून समाज ऋण फेडण्याचे आवाहन केले अशाप्रकारे स्वच्छता अभियान राबविण्यात आले कार्यक्रमाकरिता महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थिती होती व राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेविका तसेच बहुसंख्य विद्यार्थिनी उपस्थित होत्या.





















घर घर तिरंगा अभियानाअंतर्गत

विविध कार्यक्रमांचे आयोजन

**स्वतंत्र्य महोत्यव साजरा**

15 ऑगष्ट 2024

श्रीराम कला महिला महाविद्यालयामध्ये 15 ऑगष्ट 2024 हा दिवस अतिशय उत्साहाने साजरा करण्यात आला. महाविद्यालयाचे शारिरीक शिक्षण संचालक डॉ.सुधीर पाथरे यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेविकांना घेऊन संपुर्ण कार्यक्रमाची तयारी केली. झेड्याची सजावट केली. झेंडा सजवला. 15 ऑगष्टला सकाळी कार्यक्रमासाठी भारतमातेचे पुजन संस्थेचे सचिव श्री.घनशामजी मेश्राम यांनी केले व ध्वजारोहन सुध्दा त्यांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. तसे राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेविका आणि बहुसंख्य विद्यार्थीनी उपस्थित होत्या.








**शिक्षक दिन उत्साहात साजरा**

**दिनांक 05/09/2024**

महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय सेवा योजना पथकाव्दारे दिनांक 05/09/2024 रोजी डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंती निमीत्य विद्यार्थीनींनी स्वयंशासन हा कार्यक्रम करुन शिक्षक दिन साजरा केला. यावेळी विद्यार्थीनींनी स्वत: प्राध्यापीका, प्राचार्य झाल्या होत्या. महाविद्यालयातील सर्वच तासिका विद्यार्थीनींनी स्वत: घेतल्या यामध्ये अस्मीता तेलंगे, कशीश करसे, जयश्री भोंडे सहभागी होत्या.

त्यानंतर दुपारी 2 वाजता डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या विचारावर आधारित विचार मंथनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.नंदकिशोर राऊत, मंचावर डॉ.सुधीर पाथरे ,डॉ.राजेश आडे, प्रा.अभिजीत दौड, प्रा.नितीन बिहाडे, डॉ.निता केने, डॉ.योगेश काशीकर उपस्थित होते. सर्व प्राध्यापकांचे विद्यार्थीनींनी पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. त्यानंतर विद्यार्थीनींनी शिक्षक दिनाविषयी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षांनी शिक्षक, विद्यार्थी आणि आजची शिक्षण व्यवस्था या विषयावर अपले मत प्रगट केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीते करीता महाविद्यालयातील सर्वच विद्यार्थीनी आणि राष्ट्रीय सेवा योजनेच्या महिला कार्यक्रम अधिकारी डॉ.मोनाली इंगळे यांनी प्रयत्न केले.









**पोषण माह उत्साहात साजरा**

**(1 सप्टेंबर ते 30 सप्टेंबर)**

श्रीराम कला महिला महाविद्यालय धामणगाव रेल्वे येथे राष्ट्रीय सेवा योजना व गृह अर्थशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने 1 सप्टेंबर ते 30 सप्टेंबर राष्ट्रीय पोषण माहच्या निमीत्याने विविध कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.राऊत सर यांच्या मार्गदर्शनात करण्यात आले.

12/09/2024 ला महाविद्यालयातील डॉ.सुधीर पाथरे (शारिरीक शिक्षण संचालक) यांनी आहार आणि आरोग्य या विषयावर विद्यार्थीनींना मार्गदर्शन केले.

तसेच 13/09/2024 ला धामणगाव रेल्वे येथील ग्रामीण रुग्णालयातील डॉ.मनिषा चव्हाण आणि डॉ.कांचन अग्रवाल यांनी सुध्दा पुरक आहार व कुष्ठरोगावर मार्गदर्शन करुन विद्यार्थीनींना त्या विषयाबाबत जागरुक केले.

13/09/2024 व 14/09/2024 ला दोन दिवसामध्ये महाविद्यालयामध्ये गृहअर्थशास्त्र विभागाव्दारे पोषक आहारावर आधारित विद्यार्थीनींनी डिश डेकोरेशन स्पर्धा, मोदक स्पर्धा आणि पोषण सुंदरी स्पर्धा चे आयोजन करण्यात आले होते. आणि या स्पर्धामध्ये पहिल्या तिन विद्यार्थीनींना गृहअर्थशास्त्र विभागव्दारे बक्षिसे देण्यात आले.

18/09/2024 ला महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ आणि राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने कामगार कल्याण मंडळाचे अधिकारी श्री.इंगळे साहेब यांनी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.राऊत सर यांना झाड देवुन त्या वृक्षाची लागवड महाविद्यालय परिसरामध्ये केली. यावेळी महाविद्यालयाचे प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

24/09/2024 ला राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत ग्रामीण रुग्णालय येथील निलेश वानखडे (समुपदेशनअधिकारी) यांनी विद्यार्थीनींना AIDS कायदा 2017 विषयी माहिती देऊन त्यांनी माहितीपत्रकचे वाटप करण्यात आले.

तसेच पोषण माह निमित्य महाविद्यालयात निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली होती या स्पर्धेमध्ये 18 विद्यार्थीनींनी पोषण आणि कुपोषण या विषयावर निबंध लिहुन आणले होते.

अशाप्रकारे राष्ट्रीय सेवा योजने तर्फे महाविद्यालयामध्ये विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. संपुर्ण कार्यक्रमाचे आयोजन महिला कार्यक्रम अधिकारी डॉ.मोनाली इंगळे यांनी केले होते. या कार्यक्रमासाठी राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवक व महाविद्यालयातील डॉ.सुधीर पाथरे, डॉ.राजेश आडे, डॉ.निता केने, प्रा.नितीन बिहाडे, प्रा.अभिजीत दौड तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी अजय कुलकर्णी, राजेश भैय्या, राजेश मारवे, शरदभाऊ गवारले, नागोराव पंचबुध्दे, संतोष सिसोदे, प्रफुल कांबळे तसेच बहुसंख्य विद्यार्थीनी सहभागी झाल्या होत्या. अशाप्रकारे महाविद्यालयामध्ये पोषण माह विविध उपक्रमाने साजरा करण्यात आला.



















GPS Map Camera
Google
Dattapur Dhamangaon, Maharashtra, India
Q4JP+HHH, Dattapur Dhamangaon, Dhamangaon, Maharashtra 444709, India
Lat 20.781063°
Long 78.136025°
13/09/24 01:27 PM GMT +05:30


GPS Map Camera
Google
Dattapur Dhamangaon, Maharashtra, India
Q4JP+HHH, Dattapur Dhamangaon, Dhamangaon, Maharashtra 444709, India
Lat 20.781245°
Long 78.135866°
12/09/24 02:02 PM GMT +05:30


Sep 13, 2024, 13:52


GPS Map Camera
Google
Dattapur Dhamangaon, Maharashtra, India
Q4JP+HHH, Dattapur Dhamangaon, Dhamangaon, Maharashtra 444709, India
Lat 20.781096°
Long 78.136046°
13/09/24 01:07 PM GMT +05:30


GPS Map Camera
Google
Dattapur Dhamangaon, Maharashtra, India
Q4JP+HHH, Dattapur Dhamangaon, Dhamangaon, Maharashtra 444709, India
Lat 20.781037°
Long 78.136003°
24/09/24 12:59 PM GMT +05:30


वृक्षारोपण कार्यक्रम
GPS Map Camera
Google
Dattapur Dhamangaon, Maharashtra, India
Q4JP+HHH, Dattapur Dhamangaon, Dhamangaon, Maharashtra 444709, India
Lat 20.781008°
Long 78.135468°
18/09/24 12:40 PM GMT +05:30


GPS Map Camera
Google
Dattapur Dhamangaon, Maharashtra, India
Q4JP+HHH, Dattapur Dhamangaon, Dhamangaon, Maharashtra 444709, India
Lat 20.781007°
Long 78.135488°
18/09/24 12:44 PM GMT +05:30


GPS Map Camera
Google
Dattapur Dhamangaon, Maharashtra, India
Q4JP+HHH, Dattapur Dhamangaon, Dhamangaon, Maharashtra 444709, India
Lat 20.781185°
Long 78.136009°
24/09/24 12:58 PM GMT +05:30

**स्वच्छता हीच सेवा पंधरवाडा साजरा**

**17 सप्टेंबर ते 2 ऑक्टोबर**

श्रीराम कला महिला महाविद्यालय येथे स्वच्छता हीच सेवा पंधरवाडा निमित्याने महाविद्यालयात विविध उपक्रम राबविण्यात आले .

यामध्ये सर्वप्रथम सुंदर स्वच्छ सुंदर माझे गाव या विषयावर निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली यामध्ये पंधरा विद्यार्थिनींनी सहभाग नोंदविला होता.

त्यानंतर 23.9.2024 ला स्वच्छता हीच वा या विषयावर महाविद्यालयातील प्राध्यापक नितीन बिहाडे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. त्यांनी विद्यार्थिनींना स्वच्छता ही स्वभावातच असायला पाहिजे तसे संस्कार जर आपल्यावर झाले तर आपण आपल्या जीवनात स्वच्छतेला महत्त्व देतो.

त्यानंतर 24.9. 2024 ला राष्ट्रीय सेवा योजनेचा स्थापना दिवस साजरा करण्यात आला यामध्ये डॉक्टर पाथरे सर प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थिनींना राष्ट्रीय सेवा योजना हे काय आहे यावर अतिशय मौल्यवान मार्गदर्शन केले त्याचबरोबर स्थापना दिनाचे औचित्य साधून एक दिवस श्रमदानासाठी या अंतर्गत महाविद्यालय व आजूबाजूच्या परिसरामध्ये स्वच्छता करण्यात आली या कार्यक्रमाला महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

25.9.2024 ला राष्ट्रीय सेवा योजनेच्या रॅलीचे आयोजन करण्यात आले रॅलीमध्ये महाविद्यालयीन प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी व बहुसंख्या विद्यार्थिनी सहभागी झाल्या होत्या. अशाप्रकारे स्वच्छता हीच सेवा पंधरवडा विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला त्या संपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजना महिला कार्यक्रम अधिकारी डॉक्टर मोनाली इंगळे व राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेविका यांनी केले होते. कार्यक्रमाला यावेळी प्रा. डॉ. नीता केने, प्रा.अभिजीत दौंड, प्रा. नितीन बिहाडे, प्रा.राजेश आडे, तसेच शिक्षकेतर कर्मचारी अजय कुलकर्णी, राजेश भैय्या राजेश मारवे, संतोष शिसोदिया, नागोराव पंचबुद्धे, शरद गवारले, कल्पनाताई चव्हाण, प्रफुल कांबळे, आणि बहुसंख्य विद्यार्थीनी उपस्थीत होत्या.


GPS Map Camera
Dattapur Dhamangaon, Maharashtra, India
Q4JP+HHH, Dattapur Dhamangaon, Dhamangaon, Maharashtra 444709, India
Lat 20.781013°
Long 78.13604°
23/09/24 12:30 PM GMT +05:30
Google


GPS Map Camera
Dattapur Dhamangaon, Maharashtra, India
Q4JP+HHH, Dattapur Dhamangaon, Dhamangaon, Maharashtra 444709, India
Lat 20.781074°
Long 78.136136°
23/09/24 12:31 PM GMT +05:30
Google


GPS Map Camera
Dattapur Dhamangaon, Maharashtra, India
Q4JP+HHH, Dattapur Dhamangaon, Dhamangaon, Maharashtra 444709, India
Lat 20.780985°
Long 78.136018°
24/09/24 12:49 PM GMT +05:30
Google


GPS Map Camera
Dattapur Dhamangaon, Maharashtra, India
Q4JP+HHH, Dattapur Dhamangaon, Dhamangaon, Maharashtra 444709, India
Lat 20.781089°
Long 78.1361°
24/09/24 12:51 PM GMT +05:30
Google


GPS Map Camera
Dattapur Dhamangaon, Maharashtra, India
Q4JP+HHH, Dattapur Dhamangaon, Dhamangaon, Maharashtra 444709, India
Lat 20.781268°
Long 78.136117°
25/09/24 01:39 PM GMT +05:30
Google


GPS Map Camera
Dattapur Dhamangaon, Maharashtra, India
Q4JP+HHH, Dattapur Dhamangaon, Dhamangaon, Maharashtra 444709, India
Lat 20.781349°
Long 78.136075°
25/09/24 01:41 PM GMT +05:30
Google

## राष्ट्रीय एकता दिन साजरा

दिनांक 31 ऑक्टोबर 2024 रोजी राष्ट्रीय एकता दिवसा निमित्त महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना पथकाद्वारे राष्ट्रीय एकात्मता शपथविधीच्या कार्यक्रम प्राचार्यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला होता भारताचे पहिले केंद्रीय गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त त्यांना अभिवादन करण्याकरिता कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले यामध्ये महाविद्यालयातील यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नंदकिशोर राऊत राष्ट्रीय सेवा योजना महिला कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ.मोनाली इंगळे, प्रा. डॉ. नीता केने, प्रा.अभिजीत दौंड, प्रा. नितीन बिहाडे, प्रा.राजेश आडे, तसेच शिक्षकेतर कर्मचारी अजय कुलकर्णी, राजेश भैय्या राजेश मारवे, संतोष शिसोदिया, नागोराव पंचबुद्धे, शरद गवारले, कल्पनाताई चव्हाण, प्रफुल कांबळे, आणि  बहुसंख्य विद्यार्थीनी उपस्थीत होत्या.





## संविधान दिन साजरा

श्रीराम कला महिला महाविद्यालय येथे राष्ट्रीय सेवा योजना व राज्यशास्त्र विभागाद्वारे संपूर्ण भारताचे श्रद्धास्थान भारताच्या राष्ट्रीय ग्रंथाची निर्मिती आज दिनांक 26 नोव्हेंबर 1949 साली झाली होती या दिवसाचे औचीत्य साधून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते या निमित्त महाविद्यालयांमध्ये प्रथम डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन प्राचार्यांच्या हस्ते करण्यात आले त्यानंतर प्रास्ताविकेचे वाचन करण्यात आले त्यानंतर भारतीय संविधानाविषयी थोडक्यात विद्यार्थिनींना माहिती देण्यात आली.

सोबतच संविधान दिनानिमित्त रॅलीचे आयोजन करण्यात आले होते यामध्ये महाविद्यालयाच्या सर्व विद्यार्थिनी आणि प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी देखील आनंदाने सहभाग घेतला होता त्यानंतर 26.11.2008 भारतावरील दहशतवादी हल्ल्यांमध्ये शहीद झालेल्या शहिदांना श्रद्धांजली कार्यक्रम देखील आयोजित करण्यात आला होता.

महाविद्यालयातील सर्व कर्मचारी व विद्यार्थिनी यांनी यावेळी शहिदांना श्रद्धांजली दिली या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर नंदकिशोर राऊत राष्ट्रीय सेवा योजना महिला कार्यक्रमाधिकारी डॉक्टर मोनाली इंगळे, राज्यशास्त्र विभाग प्रमुख नितीन बिहाडे, डॉक्टर सुधीर पाथरे, डॉक्टर राजेश आडे, प्रा.योगेश काशीकर, राजेश कुमार भैय्या, राजेश मारवे, नागोराव पंचबुध्दे, शरद गवारले, प्रफुल कांबळे यांच्यासह बहुसंख्या विद्यार्थिनी सहभाग घेतला होता.








# महात्मा ज्योतिबा फुले स्मृतिदिन साजरा

श्रीराम कला महिला महाविद्यालय धामणगाव रेल्वे येथे दिनांक 28 नोव्हेंबर 2024 रोजी राष्ट्रीय सेवा योजना पथकाच्या वतीने महात्मा फुले दिनानिमित्त प्राचार्य डॉक्टर राऊत सर यांच्या हस्ते प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले याप्रसंगी राष्ट्रीय सेवा योजनेच्या महिला कार्यक्रमाधिकारी डॉक्टर मोनाली इंगळे, प्राध्यापक नितीन बिहाडे, डॉक्टर सुधीर पाथरे, डॉक्टर राजेश आडे, प्राध्यापक अभिजीत दौड, प्राध्यापक दिपाली भगत, राजकुमार भैया, राजेश मारवे, संतोष शिसोदे, नागोराव पंचबुध्दे, शरद भाऊ गवारले, प्रफुल कांबळे व राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक व महाविद्यालयातील विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.





## महापरिनिर्वाण दिन साजरा (6 डिसेंबर 2024 )

श्रीराम कला महिला महाविद्यालय डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर नंदकिशोर राऊत यांनी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून आदरांजली वाहिली त्यानंतर सर्व प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थिनींनी अभिवादन केले यावेळी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारावर आधारित विचार मंचचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता त्यावेळी अनेक विद्यार्थिनी आपले विचार व्यक्त केले कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता कार्यक्रमाधिकारी डॉक्टर योगेश काशीकर प्राध्यापक नितीन बिहाडे कोमल यादव यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाला डॉक्टर सुधीर पाथरे डॉक्टर राजेश आडे, अजय कुलकर्णी, राजेश मारवे, राजेश भैय्या, नागोराव पंचबुध्दे, शरद गवारले, प्रफुल कांबळे यांची उपस्थिती होती.





## गाडगे महाराज पुण्यतिथी साजरी

श्रीराम कला महिला महाविद्यालय येथे गाडगे महाराज पुण्यतिथी विविध कार्यक्रमांनी साजरी करण्यात आली 20 डिसेंबरला गाडगे महाराजांच्या फोटोला हार घालून अभिवादन करण्यात आले महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर राऊत सर यांनी हार अर्पण करून श्रद्धांजली वाहीली त्याचबरोबर महाविद्यालयांमध्ये राष्ट्रीय सेवा योजनेच्या अंतर्गत गाडगे महाराजांच्या दशसुत्री यावर निबंध स्पर्धा उद्‌बोधन आणि व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली. महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण अधिकारी डॉक्टर सुधीर पाथरे सर यांनी गाडगे महाराजांच्या स्वच्छतेचे विचार विद्यार्थ्यांना सांगितले स्वच्छता किती महत्त्वाची आहे हे पटवून दिले तसेच प्राध्यापक नितीन बिहाडे सर यांनी गाडगे महाराजांच्या दशसुत्री वर व्याख्यान दिले. कार्यक्रमाला महाविद्यालयाची रा.से.यो. तसेच विद्यार्थिनी सहभागी घेतला होता. त्याचबरोबर विद्यार्थीनींना स्वच्छतेचे महत्त्व पटावे यासाठी महाविद्यालयामध्ये स्वच्छता करण्यात आली या कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजनेचे महिला कार्यक्रमाधिकारी डॉक्टर मोनाली इंगळे यांनी केले कार्यक्रमाला महाविद्यालयातील डॉक्टर पाथरे, प्राध्यापक नितीन बिहाडे प्राध्यापक अभिजीत दौड, डॉ.निता केने तसेच शिक्षकेतर कर्मचारी अजय कुलकर्णी, राजेश भैय्या, राजेश मारवे, संतोष शिसोदे, शरद भाऊ गवारले, प्रफुल कांबळे, तसेच बहुसंख्या विद्यार्थिनी उपस्थित होत्या.












## भाऊसाहेब पंजाबराव देशमुख जयंती निमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन

श्रीराम कला महिला महाविद्यालयाचा उपक्रम स्थानिक श्रीराम कला महिला महाविद्यालय धामणगाव रेल्वेचे राष्ट्रीय सेवा योजना आणि सामाजिक शास्त्र विभागाच्या अंतर्गत डॉक्टर पंजाबराव देशमुख यांच्या जयंतीनिमित्त सलग तीन दिवस विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये निबंध स्पर्धा वक्तृत्व स्पर्धा आणि रांगोळी स्पर्धा यांचा समावेश होता दिनांक 25 डिसेंबर 2024 रोजी महाविद्यालयामध्ये निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये कुमारी प्रियंका समरीत, वैष्णवी नकाते, आचल शेंडे, समीक्षा भगोले, रुमा वाघाडे, नेहा ढोरे, वैष्णवी फेंडर, प्रतीक्षा उपासे, स्वाती यादव, अंकिता भोकरे, शितल सोन भावने, अस्मिता तेलंगे, सायली गणवीर, सोनाली यादव, कशिष करसे, गौरी माहुरले, योगिता तिवाडे, सुहाना शेख, यांनी निबंध स्पर्धेमध्ये सहभाग घेऊन डॉक्टर पंजाबराव देशमुख यांच्या जीवनावर विविध निबंध सादर केले दिनांक 26 डिसेंबर 2024 रोजी वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते त्यामध्ये गौरी मोहरले, पुनम मन, योगिता तिवाडे अंकिता भाकरे यांनी उत्कृष्ट विचार डॉक्टर पंजाबराव देशमुख यांच्या जीवनावर मांडले. या कार्यक्रमाचे परीक्षक म्हणून डॉक्टर सुधीर पाथरे, प्राध्यापक नितीन बिहाडे, यांनी काम पाहिले, दिनांक 27 डिसेंबर 2024 रोजी रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते यामध्ये अस्मिता तेलंगे, वैष्णवी मोहोळ, शिवानी येवले, प्राची मस्के, समीक्षा भगत, श्रद्धा परचाके यांनी उत्कृष्ट रांगोळ्या काढल्या या कार्यक्रमाचे परीक्षक म्हणून डॉक्टर मोनाली इंगळे, डॉक्टर नीता केने यांनी केले त्यानंतर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर नंदकिशोर राऊत यांच्या हस्ते भाऊसाहेबांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले त्यावेळी महाविद्यालयाचे भूगोल विभाग प्रमुख अभिजीत दौंड सर, प्राध्यापक नितीन बिहाडे, राजकुमार भैया, शरद गवारले, संतोष सिसोदे आणि बहुसंख्य विद्यार्थिनीनी उपस्थित होत्या.









**सावित्रीबाई फुले जयंती साजरी** (3 जानेवारी 2025)

श्रीराम कला महिला महाविद्यालय धामणगाव रेल्वे येथे 3 जानेवारी रोजी राष्ट्रीय सेवा योजना व सामाजिक शास्त्र कडून महिला प्रथम शिक्षिका सावित्रीबाई फुले यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली महिलांचे प्रेरणास्थान आणि महिला महाविद्यालय असल्यामुळे चैतन्याचे वातावरण निर्माण झाले होते अनेक विद्यार्थ्यांनी सावित्रीबाई यांच्या जीवनावर आपले विचार व्यक्त केले यावेळी महाविद्यालयाच्या ग्रंथपाल डॉक्टर नीता केने यांच्या हस्ते सावित्री फुले प्रतिमेचे पूजन करून त्यांना अभिवादन करण्यात आले त्यांनी सावित्रीबाई फुले शिक्षण विषयक कार्य विद्यार्थिनींना सांगितले यावेळी राष्ट्रीय सेवा योजना महिला कार्यक्रमाधिकारी डॉक्टर मोनाली इंगळे, डॉक्टर सुधीर पाथरे, प्राध्यापक नितीन बिहाडे, डॉक्टर राजेश आडे, अजय कुलकर्णी, राजकुमार भैया, संतोष शिसोदे, नागोराव पंचबुद्धे, प्रफुल कांबळे, शरद गवारले यांच्यासह बहुसंख्या विद्यार्थिनी उपस्थित होत्या.





**युवक दिन उत्साह साजरा**

श्रीराम कला महिला महाविद्यालय येथे स्वामी विवेकानंद  आणि राष्ट्रमाता जिजाऊ यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली या कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजना आणि सामाजिक शास्त्र विभाग का कडून करण्यात आले याप्रसंगी राष्ट्रमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांचे प्रतिमेचे पूजन करण्यात आले स्वामी विवेकानंद आणि राजमाता जिजाऊ यांचे राष्ट्रनिर्मिती करता असलेले विचारांचे योगदान या  विषयावर आपले विचार मांडले त्यानंतर महाविद्यालयीन सर्व शिक्षक कर्मचारी आणि विद्यार्थिनी यांनी महामानवांना आदरांजली वाहिली कार्यक्रमाकरिता महिला कार्यक्रमाधिकारी डॉक्टर मोनाली इंगळे, राजेश आडे, प्राध्यापक नितीन बिहाडे, श्री राजकुमार भैया, राजेश मारवे, नागोराव पंचबुध्दे व बहुसंख्य विद्यार्थिनी उपस्थित होत्या.





## राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन

श्रीराम कला महिला महाविद्यालय येथे राज्यशास्त्र विभाग आणि राष्ट्रीय सेवा योजना विभागाद्वारे राष्ट्रीय मतदार दिन प्रत्येक वर्षी उत्साहात साजरा केला जात असतो यावर्षी देखील 25 जानेवारी 2025 रोजी राष्ट्रीय मतदार दिनाच्या औचित्य साधून जगामधील सर्वात मोठे लोकशाही व्यवस्था असलेल्या आपल्या देशामध्ये मतदानाचे प्रमाण वाढावे, अधिकाधिक जनजागृती व्हावी याकरिता राष्ट्रीय मतदार दिनाचे आयोजन केले याकरिता महाविद्यालयामध्ये या निमित्त विविध उपक्रमाची राबवण्यात आले यामध्ये मतदान जनजागृती रांगोळी स्पर्धा घेण्यात आली यामध्ये सलोनी यादव, स्वाती यादव, वैष्णवी मोहोड, योगिता तिवाडे, शिवानी येवले यांनी रांगोळी स्पर्धेमध्ये सहभाग घेतला होता सोबत जनजागृती म्हणून विद्यार्थ्यांना मतदानाचे महत्त्व सांगण्यात आले सोबत रॅली काढण्यात आली याकरिता राज्यशास्त्र विभाग प्रमुख नितीन बिहाडे, राष्ट्रीय सेवा योजना महिला कार्यक्रमाधिकारी डॉक्टर मोनाली इंगळे, निकिता शिवणकर, प्राची मस्के, श्रद्धा चतुर, निकिता राऊत यांनी प्रयत्न केले कार्यक्रमाला महाविद्यालयाच्या ग्रंथपाल डॉक्टर निता केने, अजय कुलकर्णी, संतोष शिसोदे, नागोराव पंचबुद्धे, शरद गवारले तसेच बहुसंख्य विद्यार्थिनी उपस्थित होत्या.









# रस्ता सुरक्षा महिना साजरा

श्रीराम कला महिला महाविद्यालय धामणगाव रेल्वे येथे राष्ट्रीय सेवा योजना या पथकाद्वारे जानेवारी हा राष्ट्रीय रस्ता सुरक्षा महिना म्हणून साजरा करण्यात आला यासाठी धामणगाव रेल्वे येथील वाहतूक पोलीस कॉन्स्टेबल श्री अमोल सानप आणि मझहर खान यांनी महाविद्यालयातील विद्यार्थिनींना रस्तावर वाहतूक करताना गाडी चालवताना कोणते नियम पाळावे याबद्दल मार्गदर्शन केले तर अमोल सानप यांनी नियमांचे उल्लंघन केले आणि हे त्याच जर तुमच्यावर एखादी केस झाली तर तुमच्या भावी जीवनावर त्या केसचा कसा परिणाम होतो आणि तुम्हाला शिक्षणाचा फायदा होऊ शकत नाही याच बरोबर तुम्हाला रोजगार संधी सुद्धा उपलब्ध होऊ शकणार नाही याची माहिती दिली कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर राऊत सर, प्राध्यापक नितीन बिहाडे, डॉक्टर काशीकर सर, श्री अजय कुलकर्णी, संतोष शिसोदिया, शरद भाऊ गवारले, प्रफुल कांबळे उपस्थित होते कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजनेच्या महिला कार्यक्रम अधिकारी डॉक्टर मोनाली इंगळे राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेविका यांनी केले.





## छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन

श्रीराम कला महिला महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि सामाजिक शास्त्र विभागाकडून छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्सव प्रत्येक वर्षी महाविद्यालयांमध्ये उत्साहात साजरी केले जाते यावेळी महाविद्यालयांमध्ये विविध कार्यक्रमाचे आयोजन केले जात असते यावर्षी देखील महाविद्यालयांमध्ये शिवजयंती निमित्त व्याख्यान निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली होती सर्वप्रथम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर राऊत यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून हार अर्पण करण्यात आले त्यानंतर महाविद्यालयामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारावर आधारित व्याख्यानाचा उपक्रम आयोजित करण्यात आला होता यावेळी इतिहासाचे गाढे अभ्यासक.

प्राध्यापक अभिजीत दौड यांनी विद्यार्थिनींना छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास उलगडुन सांगितला. सोबत कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राध्यापक नितीन बिहाडे यांनी देखील छत्रपती शिवाजी महाराजांच्या विषयी मार्गदर्शन केले गृह अर्थशास्त्र विभाग प्रमुख राष्ट्रीय सेवा योजना महिला कार्यक्रमाधिकारी डॉक्टर मोनाली इंगळे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले, सोबतच जाणता राजा या विषयावर निबंध स्पर्धा देखील आयोजित करण्यात आली होती यामध्ये बी.ए. भाग एक दोन व तीनच्या बहुसंख्या विद्यार्थिनींनी सहभाग घेतला होता.

कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर नंदकिशोर राऊत डॉक्टर काशीकर सर, अजय कुलकर्णी, राजकुमार भैया, राजेश मारवे, संतोष शिसोदे, प्रफुल कांबळे, शरद गवारले यांच्यासह बहुसंख्य विद्यार्थिनी उपस्थित होत्या कार्यक्रमाचे संचालन तसेच आभार प्रदर्शन बीए भाग एकचे विद्यार्थिनी कुमारी सुहाना शेख हिने केले.




Department of Home-Economics
Achivements
Department of Home Economics
Curricular Activities
Feb 20, 2025, 14:27


Department of Home-Economics
Achivements
Department of Home Economics
Curricular Activities
जयंती महोत्सव
Feb 20, 2025, 13:47

# संविधान गौरव महोत्सव कार्यक्रम

श्रीराम कला महिला महाविद्यालय धामणगाव रेल्वे येथे महाराष्ट्र उच्च शिक्षण विभाग पुणे महाराष्ट्र यांच्या पत्रानुसार संविधान गौरव महोत्सव भारतीय संविधानाला 75 वर्षे पूर्ण झाले यानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले यामध्ये महाविद्यालयाचा राज्यशास्त्र विभाग आणि राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते यामध्ये प्रश्नमंजुषा, वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, आणि भारतीय संविधानाची 75 वर्ष पूर्ती या विषयावर व्याख्यानाच्या, आयोजन करण्यात आले होते या सर्व कार्यक्रमाचा थोडक्यात अहवाल पुढील प्रमाणे आहे यानिमित्त सर्वप्रथम प्रश्नमंजुषा कार्यक्रम आयोजन करण्यात आला यावेळी राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्राध्यापक नितीन बिहाडे यांनी संविधानाच्या संदर्भात विद्यार्थिनींना विविध प्रश्न विचारून संविधानाविषयी विद्यार्थिनींमध्ये रुची आणि जागृती निर्माण केली त्यावेळी राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या महिला कार्यक्रमाधिकारी डॉक्टर मोनाली इंगळे आणि भुगोल विभाग प्रमुख अभिजीत दौड उपस्थित होते.

संविधान गौरव निमित्त महाविद्यालयांमध्ये संविधानाविषयी जागृती व्हावी याकरिता वकृत्व स्पर्धा कार्यक्रम घेण्यात आला यावेळी महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींनी त्या कार्यक्रमाचे सहभाग घेतला. यामध्ये पायल यादव, स्वाती यादव, पूनम मने, कोमल नरांजे व अस्मिता तेलंगे यांनी सहभागी घेऊन संविधानाविषयी उत्कृष्ट विचार व्यक्त केले.

दिनांक 27 फेब्रुवारी 2025 रोजी भारतीय संविधानाची 75 वर्षे याविषयी निबंध स्पर्धा घेण्यात आली त्यामध्ये संपूर्ण महाविद्यालयामध्ये एकूण 32 विद्यार्थिनी सहभागी झाल्या होत्या यामध्ये बहुतेक विद्यार्थिनींनी संविधानामधील विविध विषयावर उत्कृष्ट निबंध लिहिले तीन उत्कृष्ट निबंधांना पारितोषिक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर राऊत सर यांच्या हस्ते देण्यात आले यामध्ये प्रथम पुरस्कार सुहाना शेख द्वितीय पुरस्कार पूजा मने तर तृतीय पुरस्कार वैष्णवी मोहोड यांना देण्यात आली या दिवशी दुपारी संविधानाचे गौरवशाली 75 वर्षे या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्राध्यापक नितीन बिहाडे उपस्थित होते मंचावर अतिथी म्हणून प्राध्यापक अभिजीत दौड आणि राष्ट्रीय सेवा योजना महिला कार्यक्रमाधिकारी मोनाली इंगळे यावेळी उपस्थित होत्या. अतिथींनी भारतीय संविधानाच्या जडणघडण या विषयावर आपले मत

व्यक्त केले. तर अध्यक्षांनी भारतीय संविधानाची 75 वर्षे याविषयी विद्यार्थ्यांना तिने मार्गदर्शन केले कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर नंदकिशोर राऊत डॉक्टर राजेश आडे व सुधीर पाथरे डॉक्टर नीता केने यांच्यासह महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक व वर्गशिक्षक कर्मचारी आणि बहुसंख्या विद्यार्थिनी कार्यक्रमाला उपस्थित होत्या.


















# स्वातंत्र्यवीर सावरकर पुण्यतिथी निमित्त कार्यक्रम

स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या साठव्या पुण्यतिथी निमित्त महाविद्यालयांमध्ये नेत्रदान व रक्तदान याविषयी विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले कार्यक्रमाला प्रमुख वक्ते म्हणून डॉक्टर सुधीर पाथरे हे उपस्थित होते आपल्या व्याख्यानामध्ये त्यांनी रक्तदान आणि नेत्रदान याविषयी विद्यार्थिनींना जागृत केले याविषयी त्यांनी नेत्रदानाविषयी तसेच अवयव दान विषयी विद्यार्थिनींना अतिशय मोलाचे मार्गदर्शन केले आपण जर हे दान केले तर एक सामाजिक कार्य केले याचे आपल्याला समाधान मिळते त्याचबरोबर नेत्रदान करायचं असेल तर त्यांनी विद्यार्थिनींना त्यांचा फॉर्म कसा भरायचा त्याचेही मार्गदर्शन केले कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून राष्ट्रीय सेवा योजना महिला कार्यक्रमाधिकारी डॉक्टर मोनाली इंगळे या उपस्थित होत्या डॉक्टर निता केने, डॉक्टर राजेश आडे, प्राध्यापक अभिजीत दौड हे उपस्थित होते तसेच शिक्षकेतर कर्मचारी आणि बहुसंख्या विद्यार्थिनी उपस्थित होत्या.






# जागतिक महिला दिन उत्साहात साजरा

श्रीराम कला महिला महाविद्यालय येथे जागतिक महिला दिवस उत्साहात साजरा करण्यात आला या विषयाचे आयोजन प्रत्येक वर्षी महाविद्यालयांमध्ये राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि सामाजिक शास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यापाने होत असते महिला महाविद्यालय आणि भारतीय महिलांची सर्वात क्षेत्रामध्ये विजयी घोडदौड या वर्षीच्या महिला दिवसाच्या सत्राचे मुख्य विषय होता यावेळी महाविद्यालयाच्या ग्रंथपाल डॉक्टर निता केने प्रमुख अतिथी म्हणून कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून डॉक्टर मोनाली इंगळे उपस्थित होत्या त्यावेळी सर्वप्रथम सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्याविषयी विद्यार्थिनींनी महिला दिनाच्या विषयावर आपले मत प्रकट केले त्या मध्ये स्वाती यादव, सलोनी यादव, कशीश कर्से या विद्यार्थिनींनी विचार मांडलेत त्यानंतर अतिथींनी महिलांचा आजपर्यंतचा प्रवास याविषयी भाष्य केले तर अध्यक्षांनी आजची स्त्री या विषयावर आपले मत प्रकट केले कार्यक्रमाच्या यशस्वीते करिता प्राध्यापक नितीन बिहाडे, कुमारी अस्मिता तेलंगे यांनी प्रयत्न केले. कार्यक्रमाला डॉक्टर सुधीर पाथरे, डॉक्टर राजेश आडे, प्राध्यापक अभिजीत दौड यांच्यासह महाविद्यालयाचे सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी बहुसंख्य विद्यार्थिनी यावेळी उपस्थित होत्या कार्यक्रमाचे संचालन प्रियंका राऊत तर आभार प्रदर्शन सुहाना शेख यांनी केले.












**सामाजिक सप्ताह उत्साहात साजरा (8 एप्रिल ते 14 एप्रिल)**

श्रीराम कला महिला महाविद्यालय येथे सामाजिक शास्त्र, राष्ट्रीय सेवा योजना आणि समान संधी केंद्र यांच्या व्दारे सामाजिक सप्ताहा 8 एप्रिल ते 14 एप्रिल अंतर्गत साजरा करण्यात आला. महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक कल्यान विभागा तर्फे या कार्यक्रमाचे आयोजन करण्याचे आदेश होते. त्यानुसार या सप्ताहाचे आयोजन महाविद्यालयामध्ये करण्यात आले. या सप्ताहा अंतर्गत निबंध स्पर्धा, वादविवाद स्पर्धा व वकृत्व स्पर्धा घेण्यात आल्या निबंध स्पर्धे करीता डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे समता विषयीचे विचार तर वकृत्वाकरीता भारतीय संविधान आणि सामाजिक समता हे विषय निवडण्यात आले होते. त्यानंतर समान संधीचे नोडल अधिकारी प्रा.नितीन बिहाडे आणि त्यांचे सहकारी राजेश भैय्या यांनी विद्यार्थीनींना विविध प्रकारच्या समाज कल्यानच्या शिष्यवृत्ती योजना समजावुन सांगीतल्या.

त्यांनतर महात्मा फुले जयंती देखील उत्साहात साजरी करण्यात आली. समाजिक समता सप्ताहा अंतर्गत व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये प्रा.अभिजीत दौड यांनी सामाजिक सप्ताहा विषयी विद्यार्थी यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाला रासेयो महिला कार्यक्रम अधिकारी डॉ.मोनाली इंगळे उपस्थित होत्या.

14 एप्रिल डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी जयंती साजरी करुन या सप्ताहाची सांगता करण्यात आली. या सप्ताहाला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.नंदकिशोर राऊत यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे आयोजना करीता राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थांनी सहकार्य दिले. यामध्ये अस्मिता तेलंगे, स्वाती यादव, कोमल यादव, पायल राऊत यांनी सहकार्य केले. कार्यक्रमाकरीता महाविद्यालयाचे सशिक्षक शिक्षकेतर कर्मचारी बहुसंख्य विद्यार्थिनी यावेळी उपस्थित होत्या.




vivo Y20G · by - vedant pachbudhe
Apr 14, 2025, 08:45


Apr 15, 2025, 13:33


Apr 15, 2025, 13:39

पुण्य नगरी

**City Pulse**

**जागतिक योगदिन**

## श्रीराम कला महिला महाविद्यालय, धामणगाव रेल्वे



**धामणगाव रेल्वे :** स्थानिक श्रीराम कला महिला महाविद्यालयात २१ जून रोजी राष्ट्रीय सेवा योजना व शारीरिक शिक्षण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय योगदिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला शारीरिक शिक्षण संचालक डॉ. सुधीर पात्रे यांनी योगासनाचे शरीरावर होणारे फायदे यावर मार्गदर्शन केले. त्याचबरोबर महाविद्यालयातील शिक्षकेतर कर्मचारी व शिक्षक यांना योगासनाचे काही प्रात्यक्षिक करून दाखविले. कार्यक्रमाला आदर्श महाविद्यालय धामणगाव रेल्वे येथील डॉ. किशोरजी बारापात्रे हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. तसेच प्रा. नितीन बिहाडे, डॉ. मोनाली इंगळे, डॉ. निता केणे, शिक्षकेतर कर्मचारी राजकुमार भय्या, नगोराव पांचबुद्दे, संतोष शिसोदे, शरद गावरले व प्रफुल्ल कांबळे यांची उपस्थिती होती.

तरुण भारत

## वृक्षोत्सव पंधरवडा उत्साहात साजरा

**धामणगावरेल्वे :** श्रीराम कला महिला महाविद्यालय येथे जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून भारतीय वृक्षांची लागवड करून वृक्षोत्सव पंधरवडा साजरा करण्यात आला. महाविद्यालयाच्या परिसरामध्ये वृक्षांची लागवड करण्यात आली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नंदकुमार राऊत यांच्या हस्ते आवळ्याचे रोपटे लावण्यात आले तसेच महाविद्यालयातील डॉ. पाथरे, डॉ. केने, डॉ. इंगळे यांच्या हस्ते वृक्ष लावण्यात आले. महाविद्यालयातील प्राध्यापक नितीन बिहाडे यांच्या जन्मदिनाचे औचित्य साधून त्यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. महाविद्यालयीन परिसरामध्ये आवळा, वड, पिंपळ, कडूलिंब, जांभूळ इत्यादी वृक्षांची रोपटी लावून हा महोत्सव साजरा करण्यात आला. वृक्षारोपणासाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक तसेच शिक्षकेतर कर्मचारी अजय कुलकर्णी, राजेश भय्या, संतोष सिसोदे, शरद गवारले, नागोराव पंचबुद्धे, प्रफुल्ल कांबळे यांच्यासह अनेक पर्यावरण प्रेमी नागरिक उपस्थित होते.

## श्रीराम कला महिला महाविद्यालयात स्वयंशासन

पुण्य नगरी / तालुका प्रतिनिधी




**धामणगाव रेल्वे :** स्थानिक श्रीराम कला महिला महाविद्यालयात नुकताच शिक्षक दिन साजरा करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांनी स्वयं शासन या संकल्पनेंतर्गत अध्यापनाचे कार्य केले.

कार्यक्रम राष्ट्रीय सेवा योजना आणि सामाजिक शास्त्र विभागाद्वारे घेण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांनी विविध प्राध्यापकांची भूमिका साकारली. सायली गणवीरने प्राचार्यांची भूमिका वठविली. तसेच आरती चौधरीने राज्यशास्त्र विषय, राजश्री जुमडे समाजशास्त्र, साक्षी पंधरे मराठी, शितल सोनवणे भूगोल, स्मिता तेलंगे गृहअर्थशास्त्र, प्रियंका समरीत इंग्रजी, हर्षदा सहारे ग्रंथपाल, तर कशिश करसे याने शारीरिक शिक्षण हा विषय शिकविला. त्यानंतर शिक्षक दिनाच्या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नंदकिशोर राऊत, अतिथी प्रा.अभिजित दोड, डॉ.राजेश आडे मंचावर उपस्थित होते. त्यानंतर विद्यार्थिनी सायली गणवीर, प्रियंका समरीत, कोमल नराजे, नुसरतबानो शहा यांनी आपले विचार व्यक्त केले. कार्यक्रमाच्या आयोजनाकरिता राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ.मोनाली इंगळे, प्रा.नितीन बिहाडे, कोमल यादव यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाला डॉ. सुधीर पात्रे, डॉ. मोनाली इंगळे, डॉ. योगेश काशीकर, डॉ. निता केने, प्रा.कावरे, अजय कुळकर्णी, राजेश मारवे, शरद गवार्ले, नागोराव पंचबुद्धे, संतोष शिसोदे, प्रफुल्ल कांबळे आदी उपस्थित होते.

पुण्य नगरी

City Pulse

## राष्ट्रीय पोषण माहनिमित्त विविध उपक्रम



**धामणगाव रेल्वे :** श्रीराम कला महिला महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय सेवा योजना व गृह अर्थशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये सुरुवातीला महाविद्यालय परिसरामध्ये स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. त्यानंतर डॉ. सुधीर पाथरे यांनी आहार आणि आरोग्य यावर मार्गदर्शन केले. तसेच ग्रामीण रुग्णालय येथील डॉ. मनीषा चव्हाण यांनी पूरक आहारावर मार्गदर्शन केले, डॉ. कांचन अग्रवाल यांनी कुष्ठरोग या आजारावर विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. त्यानंतर विद्यार्थिनींसाठी डिश डेकोरेशन स्पर्धा, मोदक स्पर्धा, पोषण सुंदरी स्पर्धा, निबंध स्पर्धा आदी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. यावेळी डॉ.मोनाली इंगळे, प्राचार्य डॉ.नंदकिशोर राऊत, डॉ.सुरेंद्र पाथरे, प्रा. नितिन बीहाडे, प्रा.अभिजित दौड, डॉ काशीकर, डॉ. आडे, डॉ.निता केने यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरीता जय कुलकर्णी, राजेश भैय्या, राजेश मारवे, शरद गवारले, नागोराव पंचबुद्धे, संतोष सिसोदे, प्रफुल कांबळे यांनी परिश्रम घेतले.

पुण्य नगरी

City Pulse

## श्रीराम कला महिला महाविद्यालयात स्वच्छता अभियान



**धामणगाव रेल्वे :** श्रीराम कला महिला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व सामाजिक शास्त्र विभागाद्वारे स्वच्छता अभियान नुकताच राबविण्यात आले. यावेळी विद्यार्थिनींनी महाविद्यालयाचा परिसर स्वच्छ केला. विद्यार्थिनींनी स्वच्छतेची शपथही घेतली. या कार्यक्रमाकरिता प्रा. नितीन बिहाडे, प्रा. अभिजित दौड, डॉ. मोनाली इंगळे उपस्थित होत्या. त्यानंतर महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नंदकिशोर राऊत यांनी अभिवादन केले. यावेळी अजय कुळकर्णी, नागोराव पंचबुद्धे, संतोष शिसोदे, प्रफुल्ल कांबळे उपस्थित होते.

पुण्य नगरी

## श्रीराम कला महिला महाविद्यालयात स्वच्छता अभियान

**महाविद्यालयीन विद्यार्थिनींसाठी विविध उपक्रम**

**पुण्य नगरी** / तालुका प्रतिनिधी



**धामणगाव रेल्वे :** श्रीराम कला महिला महाविद्यालय येथे राष्ट्रीय सेवा योजना पथकाकडून 'स्वच्छता ही सेवा पंधरवाडा'निमित्ताने महाविद्यालयात विविध उपक्रम राबवण्यात येत आहे.

'स्वच्छ सुंदर माझे गाव' निबंध स्पर्धा यामध्ये १५ विद्यार्थिनींनी सहभाग नोंदविला होता. प्रा. नितीन बिहाडे यांनी विद्यार्थिनींसमोर व्याख्यान दिले. राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिनाच्या निमित्ताने डॉ. सुधीर पाथरे यांनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. राष्ट्रीय सेवा योजनेच्या सर्व स्वयंसेविकांची रॅली काढण्यात आली. राष्ट्रीय सेवा योजनेच्या महिला कार्यक्रमाधिकारी डॉ. मोनाली इंगळे, प्रा. नितीन बिहाडे, डॉ. सुधीर पाथरे यांनी या कार्यक्रमांचे आयोजन केले होते. कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्रा. अभिजित दौड, डॉ नीता केने, डॉ. राजेश आडे, डॉ.काशीकर त्याचबरोबर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.नंदकिशोर राऊत यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाला नागोराव पंचबुद्धे, शरद गवारले ,संतोष शिसोदे, प्रफुल्ल कांबळे आणि महाविद्यालयातील विद्यार्थिनी सहभागी झाल्या होत्या.

# श्रीराम महिला महाविद्यालयामध्ये संविधान दिन उत्साहात साजरा




धामणगाव रेल्वे दि. २६ : स्थानिक श्रीराम कला महिला महाविद्यालय येथे राज्यशास्त्र विभाग आणि राष्ट्रीय सेवा योजना विभागाद्वारे संविधान दिनाचे आयोजन करण्यात आले होते. संपूर्ण भारतीयांचे श्रद्धास्थान भारताचा राष्ट्रीय ग्रंथाची निर्मिती आज दिनांक २६ नोव्हेंबर १९४९ ला झाली होती या दिवसाचे औचित्य साधून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते यानिमित्त महाविद्यालयामध्ये सर्वप्रथम डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन प्राचार्यांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर प्रस्ताविकेचे वाचन करण्यात आले त्यानंतर भारतीय संविधानाविषयी थोडक्यात विद्यार्थिनींना माहिती देण्यात आली.

सोबतच संविधान दिनानिमित्त रॅलीचे आयोजन करण्यात आले होते यामध्ये महाविद्यालयाच्या सर्वच विद्यार्थिनी आणि प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी यांनी देखील उत्साहाने सहभाग घेतला होता भारतावरील दहशतवादी हल्लूयामध्ये शहीद झालेल्या शहिदांकरिता श्रद्धांजली कार्यक्रम देखील आयोजित करण्यात आला होता सर्व महाविद्यालय कर्मचारी आणि विद्यार्थिनींनी यावेळी शहिदांना श्रद्धांजली दिली या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नंदकिशोर राऊत राष्ट्रीय सेवा योजना विभाग प्रमुख डॉ. मनाली इंगळे राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्राध्यापक नितीन बिहाडे डॉ सुधीर पाथरे डॉ. राजेश आडे प्राध्यापक अभिजीत दौड डॉ. योगेश काशीकर राजकुमार भैय्या राजेश मारवे नागोराव पंचबुद्धे शरद गवारले व प्रफुल कांबळे यांच्यासह बहुसंख्या विद्यार्थिनींनी सहभाग घेतला कार्यक्रमाच्या आयोजन विक्रेता भाग्यश्री तेलंगे कोमल यादव पायल यादव यांनी सहकार्य केले.

---

# डा.देशमुख की जयंती पर विविध प्रतियोगिताएं

## श्रीराम कला महिला महाविद्यालय की एक पहल



■ धामनगांव रेलवे (सं). स्थानीय श्रीराम कला महिला महाविद्यालय धामणगांव रेलवे में राष्ट्रीय सेवा योजना एवं सामाजिक विज्ञान विभाग के अंतर्गत डॉ. पंजाबराव देशमुख की जयंती के उपलक्ष्य में लगातार तीन दिनों तक विभिन्न कार्यक्रम आयोजित किए गए. इस समय निबंध प्रतियोगिता वक्तृत्व प्रतियोगिता और रंगोली प्रतियोगिता आयोजित की गई. महाविद्यालय में निबंध प्रतियोगिता का आयोजन हुआ. प्रियंका समरित, वैष्णवी नखाते आचल शेंडे, समीक्षा भगत, उमा वखाडे, नेहा ढोरे, वैष्णवी पेंढर, प्रतीक्षा उपासे, स्वाति यादव, अंकिता भाकरे, शीतल सोनबावने, अस्मिता तेलंगे, सायली गणवीर, सलोनी यादव, कशिश करसे, गौरी मोहरले, योगिता चिवाडे, सुहाना शेख ने निबंध प्रतियोगिता में हिस्सा लेकर डा. पंजाबराव देशमुख के जीवन पर विभिन्न निबंध प्रस्तुत किए. वक्तृत्व प्रतियोगिता में गौरी मोहरले, पूनम मने, योगिता तिवाडे, अंकिता भाकरे ने उत्कृष्ट विचार रखे. इस कार्यक्रम के परीक्षक के रूप में डॉ. सुधीर पठारे, प्रो.नितिन बिहाड़े ने कार्य का अवलोकन किया. रंगोली प्रतियोगिता में अस्मिता तेलंगे, वैष्णवी मोहोल, शिवानी येवले, प्राची मस्के, समीक्षा भगत, प्रियंका समृद्ध ने पंजाबराव देशमुख के जीवन पर उत्कृष्ट रंगोली बनाई. डॉ. मोनाली इंगले डॉ. नीता केने ने परीक्षक के रूप में काम संभाला.

हिंदुस्थान

# श्रीराम कला महिला महाविद्यालय येथे जागतिक महिला दिन उत्साहात साजरा




धामणगाव रेल्वे दि. १० : स्थानिक श्रीराम कला महिला महाविद्यालय येथे जागतिक महिला दिवस म्हणून उत्साहात साजरा करण्यात आला या कार्यक्रमाचे आयोजन प्रत्येक वर्षी महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि सामाजिक शास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने होत असते महिला महाविद्यालय आणि भारतीय महिलांची सर्वात क्षेत्रामध्ये सुरू असलेली पूर्वी विजयी विश्वास पूर्ण घोडदौड यावर्षीच्या महिला दिवसाच्या सत्राचे मुख्य विषय होता यावेळी महाविद्यालयाच्या ग्रंथपाल डॉ. नीता केणे प्रमुख अतिथी तर कार्यक्रमाच्या अध्यक्ष म्हणून डॉ. मोनाली इंगळे उपस्थित होत्या यावेळी सर्वप्रथम सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पूजन करण्यात आले त्यानंतर विद्यार्थिनींनी महिला दिनाच्या विषयावर आपले मत प्रकट केले यामध्ये स्वाती यादव पायल यादव कशिश करसे या विद्यार्थिनी विचार मांडलेत.

त्यानंतर अतिथींनी महिलांचा आजपर्यंतचा प्रवास याविषयी भाष्य केले तर अध्यक्षांनी आजची स्त्री या विषयावर आपले मत प्रकट केले कार्यक्रमाच्या यशस्वी ते करिता प्राध्यापक नितीन बिहाडे कु. अस्मिता तेलंगे यांनी प्रयत्न केले कार्यक्रमाला डॉ. सुधीर पाथरे डॉ. राजेश आडे प्राध्यापक अभिजीत दोड यांच्यासह महाविद्यालयाचे सर्व शिक्षकेतर कर्मचारी आणि बहुसंख्य विद्यार्थिनी यावेळी उपस्थित होत्या कार्यक्रमाचे संचालन कुमारी प्रियंका राऊत तर आभार खुशबू शेख यांनी मानले.

तरुण भारत

## श्रीराम कला महिला महाविद्यालय

**धामणगाव रेल्वे** : स्थानिक श्रीराम कला महिला महाविद्यालय येथे संत गाडगेबाबा पुण्यतिथी उत्साहात साजरी करण्यात आली. या पुण्यतिथीनिमित्त महाविद्यालयामध्ये गेली दोन दिवस विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये स्वच्छता अभियान, वादविवाद स्पर्धा, निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली. महाविद्यालयाच्या सामाजिक शास्त्र विभाग आणि राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्याकडून कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नंदकिशोर राऊत यांच्याहस्ते संत गाडगेबाबा यांना हारअर्पण करण्यात आले. त्यानंतर महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थिनींनी संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेला अभिवादन केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कार्यक्रम अधिकारी डॉ. योगेश काशीकर, प्रा. नितीन बिहाडे, सलोनी यादव, अपेक्षा गावंडे, कशिष करसे, पूजा इंगळकर, शिवानी यावले, सायली गनविर यांनी प्रयत्न केले. कार्यक्रमाला प्रा. अभिजीत दौड, डॉ. सुधीर पाथरे, डॉ.राजेश आडे, डॉ. निता केणे, प्रा. दादाराव उइके, अजय कुळकर्णी, राजकुमार भैय्या, राजकुमार मारवे, संतोष शिसोदे, नागोराव पंचबुद्धे, प्रफुल कांबळे यांच्यासह बहुसंख्य विद्यार्थ्यांनी उपस्थित होत्या.

## श्रीराम महिला महाविद्यालय

**धामणगाव रेल्वे** : स्थानिक श्रीराम कला महिला महाविद्यालय येथे राज्यशास्त्र विभाग आणि राष्ट्रीय सेवा योजना विभागाद्वारे संविधान दिनाचे आयोजन करण्यात आले होते. संपूर्ण भारतीयांचे श्रद्धास्थान भारताच्या राष्ट्रीय ग्रंथाची निर्मिती २६ नोव्हेंबर १९४९ ला झाली होती. या दिवसाचे औचित्य साधून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यानिमित्त महाविद्यालयामध्ये सर्वप्रथम डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन प्राचार्यांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर प्रस्ताविकेचे वाचन करण्यात आले. त्यानंतर भारतीय संविधानाविषयी थोडक्यात विद्यार्थिनींना माहिती देण्यात आली. सोबतच संविधान दिनानिमित्त रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. दहशतवादी हल्ल्यामध्ये वीर मरण आलेल्या हुतात्म्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. कार्यक्रमाला प्राचार्य डॉ. नंदकिशोर राऊत, डॉ. मनाली इंगळे, प्रा. नितीन बिहाडे, डॉ. सुधीर पाथरे, डॉ. राजेश आडे, प्रा. अभिजीत दौड, डॉ. योगेश काशीकर, राजकुमार भैय्या, राजेश मारवे, नागोराव पंचबुद्धे, शरद गवारले व प्रफुल कांबळे यांच्यासह बहुसंख्या विद्यार्थिनींनी सहभाग घेतला. कार्यक्रमाच्या आयोजन भाग्यश्री तेलंगे, कोमल यादव, पायल यादव यांनी सहकार्य केले.